# २. अर्जदस्त

**संत एकनाथ**

संत एकनाथ (जन्म इ. स. १५३३ - मृत्यू (समाधी) इ.स. १५९९) - पैठण येथील संत भागवत संप्रदायाला भक्कम आधार देण्याचे, ज्ञानेश्वरीची प्रत शुद्ध करण्याचे ऐतिहासिक कार्य करणारे मानवतावादी - समतेचा पुरस्कार करणारे साधु पुरुष. त्यांचे गुरु जनार्दन स्वामी. श्रीमत् भागवताच्या ११ व्या स्कंधावर मराठीतून टीका (एकनाथी भागवत) रूक्मिणी स्वयंवर, चतुःश्लोकी भागवत - भारूड रचना विशेष लोकप्रिय. भावार्थ रामायण, प्रल्हाद चरित्र इ. रचना. अर्जदस्त, हिंदु तुर्कसंवाद इ. गद्यप्रधान लेखन.

एकनाथांनी विविधतापूर्ण रचना केली. काही गद्य - पत्र - अर्ज - विनंती यासारख्या व्यावहारिक पातळीवरील बाबीतून ही अध्यात्म दर्शन घडवले. रुपक रचना हा त्यांचा लेखन विशेष. सांसारिक - प्रापंचिक गोष्टीत ही अध्यात्माची शिकवण त्यांनी दिली. 'अर्जदस्त' मधून तत्कालीन अर्जाची परिभाषा, पद्धत, शैली-तपशील लक्षात घेता येतो. तसेंच रुपक शैलीचाही परिचय घडतो.

---

अर्जदस्त अर्जदार बंदगी । बंदेनवाज साहेब आलेकम् सलाम । कायापुरीकर जिवाजीपंत सुभेदार । बुधाजीपंत फडणीस । परगणे शरीराबाद । हकीगत । सरकारची रजा घेऊन निघाले । तों स्वार होऊन किल्ले कायापूर येथें दाखल जाहले । दरोबस्त अंमलदार सर्व सरकारकामास वाकब नव्हते । ऐशियास परगणें मजकूरचें कायापुरांतील उखडे रुजू झाले । सदरहु परगणा व जमातदार । सरकाचे पुढारी लोक यांची नांवें । पाटील कुळकर्णी । शेटे महाजन । देशमुख देशपांडे । यांचीं खालीं लिहिल्याप्रमाणें नांवें । दंभाजी शेटे । कामाजीराव महाजन । मनाजीराव देशमुख । ममताई देशमुखीण । रसनाईक पाटलीण । केसाजीपंत कुळकर्णी । जराजीराव देशपांडे । हे फार हरामजादे

आहेत । कचेरींत जोम धरून बसतात । सरकारचें काम सुरू होऊं देत नाहींत । दंभाजी शेटे यांनी संत बाजारांतील भावाचा बिघाड केला । आयुष्य धान्याचें माप शुद्ध भरीत नाहींत । बाळपणांत क्रीडा । तारुण्यांत स्त्रीसंग । वृद्धपणीं चिंता । याप्रमाणें माया चालू केली । भस्म रुद्राक्षमाळा पादुका जटा वल्कलें कंथा दंडकमंडलु । यांचा मात्र सुकाळ केला । या योगानें खरा परमार्थ बुडाला । देह अभिमान वाढविला । कामाजीराव महाजन । यानें आपलें पांच बंधु आपण सरकारचे रिसाल्यावर ठेविले ।। त्यांतील भ्रम । हट्ट । द्वेष । अधैर्य । साहस । अविवेक । असत्य । कौटिल्य । परोत्कर्ष । सहनत्त्व । हे दहा बारगीर । हाताखाली घेऊन । तपस्वी व्रतें नागविले । विवेकाचें ठाणें उठविलें । योग याग जप तप ध्यान आष्टी समाधी चतुर्विध पुरुषार्थ हे कायापुरींतून बाहेर घालविले । व्यभिचाराचा गोंधळ फार केला । मनाजीराव देशमूख आपले मतें परस्पर कारभार करितात । स्त्रीसुनांमध्यें धूत धन याचा अंगिकार केला । त्या योगानें प्रजा आपआपला धर्म विसरल्या । ममताई सरदेशमुखीण इनें आपल्या स्वपराक्रमानें संपूर्ण परगणा जर्जर केला । सर्व लोक मायाजाळांत गुंतविले । परमार्थाविषयीं एकासही फडकूं देत नाहीं । रसनाई पाटलीण इणें खाण्यावर दृष्टी दिली आहे । केसोपंत काळे कुळकर्णी । जराजीराव देशपांडे । यांनीं आपल्या जातींत फितूर केला । काळ्याचे पांढरे झाले । आणि पांढरीचा वसूल करविला । ऐसे आम्ही थोड्या दिवसांत वाकब होऊन । सरकारची कामगिरी करीत होतों । तों तुमचा नवज्वर चोपदार आला । त्यांने अशी करणी केली कीं । यमाजी भास्कर सरसुभेदार । यांची मागून तल्लब येणार आहे । त्यांनीं त्रिदोषाची रवानगी केली । त्या धास्तीनें तमाम परगणा ओस पडला । सदरहू तपशील । शीरपूर थरथरां कांपूं लागलें । डोळसवाडी उजाड जाहली । नाकपूर वाहूं लागलें । कानपूर ओस पडलें । दिवेलावणी मोडली । मुख नगरांतील व्यापार बंद जाहले । रसनाई पाटलीण वांकडी पडली । तगादा करावा तर कांहीच बोलत नाहीं । दंताळवाडीची कचेरी बरखास्त जाहली । मानपुरांनीं पड घेतली । उरगांव धडधड करितें । हातगांव उदरवाडीचे खसाल्यानें जेर जेर झाले । याच्यानें

लावणी होत नाहीं । पाथर्गांवांचे गेटे बसले । कंबरवाडी वधून राहिली । दोन गांवें तर फार उजाड झालीं । त्याचा तपशीलवार । ऐशी परागण्याची कीर्द बुडाली । पुराण रानें वोस पडलीं । त्यांत नवज्वर चोपदार हुजूर न्यावयाची उतावीळ करिती । हुजुर यावें तर परगणे मजकूरचा । कांहीं वसूल झाला नाहीं । धभाजीपंत कुरसीस करितील त्या धास्तीने उगीच बसलों । आम्हांस तर सरकारच्या पायावेगळा आश्रय नाहीं । हजार अन्यायी । याजवर बुधाजीपंताचा अर्ज कीं । रयत बिघडल्यामुळें । या त्रासानें जिवाजीपंत सुभेदार निघून जाण्याचे बेतांत आहेत । त्यास सरकारनें । त्याजवर कृपा करून । तत्त्वज्ञान पेनशन देऊन । ब्रह्मपुरींत रहावयास जागा द्यावी । बंदगी रोशन होय । एकाजनार्दनी अर्जदस्त ॥ १ ॥